# कार्यालय,श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती

-जा.क्र.शि/अधि /प्रशा–५/ १२२८ /२०२१ दिनांक : २४/५/२०२०

**अत्यंत महत्वाचे**

## परिपत्रक

प्रति,

**श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती व्दारा संचालित**
**सर्व शाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य/मुख्याध्यापक**
**व इतर संस्थेचे संस्था प्रमुख .**

**विषय :–** **राज्यातील कोरोना आपत्ती निवारणाच्या उपाययोजनांकरीता माहे मे,२०२१ च्या वेतनातील एक/दोन दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीला देणगी म्हणून उपलब्ध करून देण्याबाबत.**

**संदर्भ :–** **महाराष्ट्र शासन,समान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र.११२१/प्र.क्र.८७/१६ अ, दिनांक ७ मे, २०२१**

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, सद्यास्थितीत भारतामध्ये कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढलेला असून हयाकरीता महाराष्ट्र शासनाकडून प्रभावी उपाययोजना व प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच गेल्या २२ मार्च, २०२० पासून या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने नागरीकांची सुरक्षा व जिवित हानी होणार नाही याची सर्वातोपरी खबरदारी घेतलेली आहे आणि घेत आहे. भारतीय नागरीकांकडून त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. हे संकट महाराष्ट्रात सर्वाधिक असून महाराष्ट्र शासन त्याचा मोठया धैर्याने सामना करीत आहे. कोरोना सारख्या जागतिक महामारीचा सामना करतांना एक नवे आर्थिक संकटही निर्माण झालेले आहे. हया दोन्ही संकटावर मात करण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या पाठीशी आपण सर्वांनी भक्कमपणे उभे राहाण्याची आवश्यकता आहे.

शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांनी आखून दिलेल्या मार्गावर चालतांना श्री शिवाजी शिक्षण संस्थेने देशातील कठीण प्रसंगी नेहमीच सामाजिक जबाबदारीचे भान जपलेले आहे. आजच्या अत्यंत भीषण संकटकाळी तर आपल्या संस्थेची जबाबदारी अधिक वाढली आहे. ही जबाबदारी व कर्तव्य लक्षात घेवून संस्थेने मुख्यमंत्री सहाय्यता निधीला जास्तीत जास्त सहकार्य करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

हया राष्ट्रीय आपदा प्रसंगी ज्ञानदानाचे कार्य करणारी आपली संस्था नेहमीच पुढे असते परंतु संपूर्ण भारत लॉकडाऊन असल्यामुळे रोगनिवारण कामकाजाकरीता आपल्या संस्थेला सक्रीय होता आले नाही. अशा परिस्थितीत सामाजिक जाणीवेतून श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती व्दारा संचालित सर्व संस्थांमधील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे एक/दोन दिवसाच्या वेतनाची रक्कम **मुख्यमंत्री सहायता निधी** म्हणून उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने संदर्भातील परिपत्रकान्वये निर्देशित केलेले आहे.

सबब आपणांस विनंती करण्यात येत आहे की, आपले अधिनस्त व आपण स्वतः माहे मे,२०२१ चे वेतनातून प्राचार्य/प्राध्यापक/मुख्याध्यापक यांचे दोन दिवसाचे वेतन (मुळ वेतन + महागाई भत्ता ) व क.म.शिक्षक/माध्यमिक शिक्षक/निर्देशक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतनातून एक दिवसाचे वेतनाची रक्कम (मुळ वेतन + महागाई भत्ता ) कपात करून संस्था कार्यालयात दिनांक १० जुन, २०२१ पर्यंत धनादेशाव्दारे पाठवावी व तशी पावती घ्यावी. तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये संस्थेच्या अंतर्गत सर्व प्राचार्य/प्राध्यापक/मुख्याध्यापक/शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचा संस्थे मार्फतच निधी जमा करून एकत्रित रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा करावयाची आहे, त्यामुळे वेगळा निधी पाठवु नये,याची नोंद घ्यावी. तसेच ज्या कर्मचा–यांचा हया निधीमध्ये सहभाग आहे त्यांच्या नावाची यादी सुध्दा सोबत पाठविण्यात यावी. हया कार्यास प्रथम प्राधान्य देण्यात यावे, ही विनंती. काही अडचण निर्माण झाल्यास संदर्भांकित शासन परिपत्रकाचा अभ्यास करून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

(एस.एस.खाडे)
सचिव,
श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती

प्रत सविनय सादर :–

१. मा.अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती यांचे स्विय सहाय्यक यांना माहितीकरीता.
२. संस्थेच्या कार्यकारी परिषदेचे सर्व सन्मा.पदाधिकारी/सदस्य यांना माहितीकरीता सादर.
३. मा.सहसंचालक,उ.शि.अमरावती/नागपूर यांना माहितीकरीता सादर.
४. मा.शिक्षणाधिकारी,जि.प.अमरावती/नागपूर/भंडारा/वर्धा/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीकरीता.
५.मा.जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीकरीता.

प्रतिलिपी :–

१.अधिक्षक,प्रशासन,श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
२.लेखा विभाग, श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.